पंतप्रधानांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी साधला संवाद (09 नोव्हेंबर 2026)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष महामहिम श्री वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला.

2. राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी सुरू असलेल्या संघर्षाशी संबंधित अलीकडील घडामोडींबाबत आपला दृष्टिकोन मांडला.

3. या संघर्षाचे निराकरण संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातूनच झाले पाहिजे, या भारताच्या सातत्यपूर्ण भूमिकेचा पुनरुच्चार करत पंतप्रधानांनी भारताच्या मानव-केंद्री दृष्टिकोनाची पुन्हा पुष्टी केली. संघर्षाच्या शांततापूर्ण तोडग्यासाठी उद्देशित असलेल्या सर्व प्रयत्नांमध्ये योगदान देण्यास भारत सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

4. दोन्ही देशांच्या जनतेच्या परस्पर हितासाठी विविध क्षेत्रांमधील भारत-युक्रेन द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट करण्याच्या उपाययोजनांवरही दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

नवी दिल्ली

09 नोव्हेंबर 2026